**व्यवसायरोध भत्त्याऐवजी खाजगी**
**वैद्यक व्यवसाय करण्यास दिलेली**
**<u>सवलत रद्द करणेबाबत.</u>**

**महाराष्ट्र शासन**
**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,**
**शासन निर्णय क्र.एनपीए-२०१०/प्र.क्र.११५/१०/वैसेवा-२**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**
**दिनांक - १८ ऑगस्ट, २०१०.**

**वाचा -** वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्र.मंमंनि-२००८/प्र.क्र.४४/२००८/वैसेवा-२, दिनांक २७ मार्च, २००८.

**शासन निर्णय -**

संदर्भाधीन शासन निर्णयान्वये राज्यातील शासकीय वैद्यकीय, दंत व आयुर्वेद महाविद्यालयातील अध्यापकांना व्यवसायरोध भत्ता किंवा व्यवसायरोध भत्त्याऐवजी खाजगी वैद्यक व्यवसाय करण्याची सवलत देण्यात आली आहे. सदर सवलतीचा लाभाचा शासन स्तरावर आढावा घेण्यात आला. त्यावेळी असे दिसून आले की, शासकीय वैद्यकीय, दंत व आयुर्वेद महाविद्यालयातील एकूण अध्यापकांची संख्या विचारात घेता, खाजगी वैद्यक व्यवसायाची सवलत स्विकारलेल्या अध्यापकांची संख्या फारच अत्यल्प आहे. त्यामुळे सदर बाब विचारात घेता, शासनाने पुनर्विचार करुन घेतलेल्या निर्णयानुसार राज्यातील शासकीय वैद्यकीय, दंत व आयुर्वेद महाविद्यालयातील अध्यापकांना व्यवसायरोध भत्त्याऐवजी खाजगी वैद्यक व्यवसाय करण्यास दिलेली सवलत या आदेशाच्या दिनांकापासून रद्द करण्यात येत आहे.

**२.** खाजगी वैद्यक व्यवसायाची सवलत रद्द करण्यात आल्यानंतरही राज्यातील शासकीय वैद्यकीय, दंत व आयुर्वेद महाविद्यालयातील अध्यापक खाजगी वैद्यक व्यवसाय करीत असल्याची बाब निदर्शनास आल्यास संबंधित अध्यापकांविरुध्द म.ना.से (शिस्त व अपिल) नियम, १९७९ आणि म.ना.से (वर्तणूक) नियम, १९७९ मधील तरतुदीनुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

**३.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra gov.in** या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१००८१८१५३२४२००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सही/-**
**(वि.कि.आल्हाट)**
**उप सचिव (वैसेवा), महाराष्ट्र शासन**

प्रति,

१ मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
२ मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
३ मा.उप मुख्यमंत्र्यांचें सचिव, मंत्रालय, मुंबई
४ मा.मंत्री (वै.शि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५ मा.राज्यमंत्री (वै.शि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६ प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
७ प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
८ महालेखापाल-१/२, (लेखा परिक्षा/लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
९ अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१० निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
११ सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य
१२ संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
१३ संचालक, आयुर्वेद संचालनालय, मुंबई
१४ सर्व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय, दंत व आयुर्वेद महाविद्यालये
१५ सर्व सह /उप सचिव/अवर सचिव/अवर सचिव (विधी)/कक्ष अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
१६ सर्व मंत्रालयीन विभाग
१७ निवड नस्ती (वैसेवा-२)